**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३३/२०१६-१७/२०२ दिनांक: २८-११-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. ३३/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बिरदेव सुखदेव माने<br>मु. पो. कडनूर<br>ता. जत, जिल्हा. सांगली : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग जत | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री बिरदेव सुखदेव माने रा. कुडनूर ता. जत. जि. सांगली (ग्राहक क्रमांक २७०४०००२७६०) यांनी त्यांच्या गट क्र. २६७ या शेत जमिनीमध्ये पाच अश्वशक्ती मोटरसाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वितरण कंपनीकडे अर्ज करुन दिनांक २२-०६-२०१५ रोजी रु. ६१००/- भरणा केले मा. विद्युत नियामक आयोगाच्या कृति मानके विनियमाप्रमाणे, वितरण वाहिनीचा रोहित्रासह विस्तार असल्यामुळे तक्रारदार यांना एक वर्षामध्ये विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते. तसा वीज पुरवठा सदर मुदतीत त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी दिनांक २४-०८-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे गा-हाणे दाखल केले. सदर कक्षाने दिनांक १९-१०-२०१६ च्या आदेशाने, प्रतिक्षा यादीप्रमाणे तक्रारदार यांना वीज जोडणी देणेत येईल असे कळविले, कक्षाचा सदर निर्णय अमान्य झाल्यामुळे तक्रारदार यांनी या मंचासमोर दि. २५-१०-२०१६ रोजी गा-हाणे दाखल केले आहे.

२) वितरण कंपनीतर्फे लेखी निवेदन दाखल करण्यात आले असून त्यामध्ये असे कथन केले आहे की, तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी एक खांब उच्च दाब वाहिनी , तीन खांब लघुदाब वाहिनी व ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे रोहित्र उभारणी करणे आवश्यक आहे. प्रतिक्षा यादीमधील तक्रारदार यांचा ७४२ वा क्रमांक आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी ) विनियम २००५ मधील परिच्छेद ४.४ प्रमाणे तक्रारदार यांना प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर विद्युत पुरवठा करणेत येईल असे वि.प. यांचे म्हणणे आहे.

३) तक्रारदार यांनी कोटेशन व दि. २२-०६-२०१५ च्या पावतीच्या छायांकित प्रती आणि अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेश असे कागद दाखल केले आहेत. वि.प. तर्फे जेष्ठता यादीची प्रत दाखल केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री खापरे आणि वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री एस.एस. दराडे यांची तोंडी निवेदने ऐकणेत आली. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

४) या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे त्यांच्या कृषि पंपासाठी नविन वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

(२) तक्रारदार यांना, यापूर्वी झालेल्या विलंबाचे कारणा वरुन भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय?

उत्तरः- नाही.

(३) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

५) उपलब्ध कागदपत्रां वरुन हे स्पष्ट होते की, तक्रारदार यांनी त्यांच्या गट क्र. २६७ मध्ये कृषि पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेबद्दल रितसर अर्ज देऊन दि. २२.०६.२०१५ रोजी वि.प. कडे रु. ६१००/- भरणा केले. तक्रारदार यांना नविन वीज जोडणी शेती पंपासाठी देणे करिता, एक खांब उच्च दाब वाहिनी , तीन खांब लघुदाब वाहिनी व ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे रोहित्र उभारणी करणे आवश्यक आहे तक्रारदार यांना एक वर्षामध्ये वीज जोडणी मिळाली नाही. प्रतिक्षा यादीचे अवलोकन करता त्यामध्ये ७५० लोकांची नांवे नमूद असून तक्रारदार यांचा ७४२ वा क्रमांक आहे. ही जेष्ठता यादी नोव्हेंबर २०१० पासूनची आहे.

६) वि.प. यांचे असे निवेदन आहे की, तक्रारदार यांना त्वरीत वीज जोडणी दिल्यास , सन-२०१० पासून प्रतिक्षा यादीतील पैसे भरलेल्या अगोदरच्या सर्व शेतक-यांवर अन्याय होणार आहे. उपरोक्त विनियम २००५ मधील परिच्छेद ४.४ प्रमाणे तक्रारदार यास प्रतिक्षायादी प्रमाणे वीज जोडणी देणे योग्य होईल. या ऊलट तक्रारदारतर्फे असे निवेदन केले की,जेष्ठता/प्रतिक्षा यादी अशी कोणतीही संकल्पना विद्युत कायद्यात नमूद नाही आणि जर वितरण कंपनीस कृतिमानके साध्य करणेस काही अडचणी येत असतील तर त्या विद्युत नियामक आयोगाकडून निवारण करुन घेणे आवश्यक राहिल.

७) तक्रारदार यांच्या निवेदनात तथ्य असल्याचे निश्चितपणे दिसून येते. प्रत्यक्षात जरी काही अडचणी असल्या तरी कृति मानके विनियम या मधील तरतूदी विचारात घ्याव्याच लागतील, जर विहीत कालावधीमध्ये वीज पुरवठा करणेत आला नाही तर प्रत्येक आठवडयाच्या विलंबापोटी भरपाई मिळणेचा अधिकार प्रदान करणेत आला आहे. या प्रकरणात तक्रारदार यांनी गा-हाणे अर्जात भरपाईची मागणीही केली आहे. तथापी सुनावणीच्या वेळी तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी भरपाईची मागणी सोडून दिली असून फक्त निश्चित कालावधीत वीज जोडणी देणेचा आदेश व्हावा एवढीच विनंती या मंचासमोर केली आहे. ती मान्य करावी लागेल.

८) तक्रारदारतर्फे असे सांगण्यात आले की रोहित्र बसविण्याचे कामही पूर्ण झाले आहे. ते काहीही असो, तक्रारदार यांना विशिष्ट मुदतीत नविन वीज जोडणी मिळणेचा अधिकार होता याबद्दल वाद असू शकणार नाही.

वरील विवेचनावरुन असे निश्चित होते की, तक्रारदार यांचा गा-हाणे अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजूर होणेस पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे कृषी पंपासाठी  नविन वीज जोडणी नियमानुसार, दिनांक १५.०३.२०१७ पर्यन्त  वि.प. वितरण कंपनी  यांनी द्यावी असा वि. प. यांना आदेश करणेत येत आहे.
२) तक्रारदार यांची भरपाई मिळणेची मागणी, त्यांनी सुनावणीच्या वेळी सोडून दिल्यामुळे रद्द करणेत येत आहे.
३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार  निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास  कळवावे.
४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे  आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे  करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री  प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |